NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## गुरुवार, दि. २७ मार्च, २०२५ रोजी दुपारी ०१: ०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९४ वी बैठक **गुरुवार, दि.२७ मार्च, २०२५ रोजी दुपारी ०१:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.०४ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.०४ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | दि.०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब फेर विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| | टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या विवरणपत्रान्वये पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे एकूण ६५ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br><br>उपरोक्त प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीनूसार अधिष्ठाता मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेस असणे आवश्यक आहे.<br><br>त्याअनुरोधाने अधिष्ठाता मंडळाने दि. ११/०२/२०२५ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार केलेली शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०४/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केली असता, त्यावर बाब क्र. ५ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित झाला होता.<br><br>"महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमांच्या लगतच्या वर्षाच्या (२०२४-२५) प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती व इतर संबंधित माहिती यासह सदरचा विषय पुनश्चः विचारार्थ अधिष्ठाता मंडळाकडे सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले."<br><br>सदरील ठरावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव सादर केलेल्या संबंधित महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या विद्यापीठाचे पत्र क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/२१२७, दि.१७/०३/२०२५ अन्वये व दूरध्वनीद्वारे मागविण्यात आली होती. त्याअनुरोधाने सदरील महाविद्यालयांनी सादर केलेल्या माहितीसह सदरची बाब पुन:श्च दि. २०/०३/२०२५ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत फेरविचारार्थ सादर केली असता, त्यावर बाब क्र. ९ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.<br><br>"दि.०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.५ नुसार | |

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीसह शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याच्या बाबीबाबत अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. सदर अभ्यासक्रमाचे नैसर्गिक विस्तार असल्याने विद्यार्थी संख्या नसली तरी नैसर्गिक विस्तारासाठी संलग्निकरण देणे आवश्यक आहे यास्तव अधिष्ठाता मंडळाकडून व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते शिफारस करण्यात आली.<br><br>सबब, दि. ०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब फेर विचारार्थ. | |
| ठराव : | **दि.०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, पारंपारिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे व व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे, AICTE च्या मान्यतेच्या अधीन राहून, राज्य शासनास पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करणेसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१ ते १.१३ पर्यंतची कार्यवाही पूर्ण झाली असून सदरील विहित कार्यवाहीनुसार पात्र झालेले प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम मुदत ही ३० सप्टेंबर अशी आहे. त्याससंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/५२१०, दि.२२/०७/२०२४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करणेसाठी एकूण ३४ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.<br>उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मुद्दा क्र. १.८ अन्वये प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकामी डॉ. पी. एम. पवार यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या छाननी समितीच्या बैठका दि.१६/११/२०२४ व दि.०२/०१/२०२५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदरील छाननी समितीच्या बैठकांचा अहवाल दि.११/०२/२०२५ रोजीच्या अधिष्ठता मंडळाच्या बैठकीत सादर केला असता अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. ०७ अन्वये छाननी समितीचा अहवाल स्विकारून मा. कुलगुरू महोदयांना सादर केला. (सदरील अहवालाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे).<br>दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१३ च्या अनुषंगाने मा.कुलगुरू महोदयांनी गठित केलेल्या तज्ज्ञ समित्यांनी महाविद्यालयांस प्रत्यक्ष भेट देवून परिशिष्ट "ब" मध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करून त्याचा अहवाल दि.२७/०२/२०२५ व दि.२०/०३/२०२५ रोजीच्या अधिष्ठता मंडळाच्या बैठकांमध्ये सादर केला असता अधिष्ठता मंडळाने तज्ज्ञ समित्यांचा अहवाल स्विकारून मा. कुलगुरू महोदयांना सादर केलेला आहे. (सदरील अहवालाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.) | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये सदर प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह शासनाकडे दि.०१/०४/२०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.<br><br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करणेसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१ ते १.१३ पर्यंतची कार्यवाही पूर्ण झाली असून सदरील विहित कार्यवाहीनुसार पात्र झालेले प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव : | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१ ते १.१३ पर्यंतची कार्यवाही पूर्ण झाली असून सदरील विहित कार्यवाहीनुसार पात्र झालेले प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये पारंपारिक अभ्यासक्रमांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे व व्यवसायिक अभ्यासक्रमांचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे, AICTE च्या मान्यतेच्या अधीन राहून, राज्य शासनास पाठविण्यास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली**<br><br>विवरणपत्र अ (पारंपारिक अभ्यासक्रम) मधील अ. क्र. ९ ते ११ हे महाविद्यालय महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१३/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील विहीत निकष पुर्ण करीत नसल्याने त्यांना सर्वानुमतमे अपात्र करण्यात आले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०४ ] | **Department of Youth Affairs & Sports Govt. of India व प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: जिल्हास्तरीय विकसित भारत युवा परिषद अंतर्गत ०२ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यासंदर्भात सामंजस्य कराराचा मसूदा भारत सरकारचे युवा व्यवहार आणि क्रिडा मंत्रालय यांच्याकडून, प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाशी MoU करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. प्रस्तुत विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागास Department of Youth Affairs & Sports Government of India यांच्याकडून प्राप्त झालेला सामंजस्य कराराच्या मसूद्यास MoU Cell ची मान्यता आवश्यक असल्याने दि.२७/०२/२०२५ रोजी प्रस्तावित कराराचा मसुदा MoU Cell कडे शिफारशीसाठी सादर केलेले होते. MoU Cell मार्फत दि.२८/०२/२०२५ रोजी झालेल्या २० वी ऑनलाईन बैठकीतील ठराव क्र.१ नुसार प्रास्तावित MoU संदर्भात खालीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत.<br>१) भारत सरकारचे युवा व्यवहार व क्रिडा मंत्रालय यांच्या कडून प्राप्त झालेला मसुदा सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने अंतिम करून करार करण्यात यावा.<br>२) सदर MoU स अनुसारुन आयोजित करण्यात येणारे उपक्रम व त्यासाठी येणारा खर्च या संबंधी संचालक राष्ट्रीय सेवा योजना यांनी पडताळणी करावी व तदनंतर MoU अंतिम करण्याची कार्यवाही योग्य राहील.<br>सदर MoU झाल्यानंतर संबंधित विभागाकडून उपक्रमासाठी आर्थिक साहाय्य मिळणार असल्याने उपक्रम आयोजित करण्याची जबाबदारी विद्यापीठावर आहे. सदर उपक्रमामुळे प्रस्तुत विद्यापीठ व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना तसेच सोलापूर जिल्हयाच्या आसपासच्या १८ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे प्राप्त अनुदान खर्चाचा तपशिल देखिल संबंधित मसुदा मध्ये कळविले होते. सदरील अनुदान मिळण्याकरिता व मिळालेल्या अनुदानाच्या सहाय्याने कार्यक्रम राबविण्याकरिता सामंजस्य कराराचा मसूद्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक असल्याने व आगामी काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक नसल्याने सदरील सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे.<br>सबब, Department of Youth Affairs & Sports Govt. of India व प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये केलेली कार्यवाही माहितीस्तव. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव : | **Department of Youth Affairs & Sports Govt. of India व प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात निशुल्क पध्दतीने सुरु करण्याबाबत सामंजस्य करार अंतर्गत विविध अभ्यासक्रम सुरु करण्यासंदर्भात सामंजस्य कराराचा मसूदा दि.२०/०३/२०२५ रोजी प्राप्त झालेला होता.<br>प्रस्तुत विद्यापीठाकरिता नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ मार्फत सामंजस्य (MoU) करारासाठी MoU समिती स्थापन करण्यात आली आहे. सदरील MoU समिती मार्फत प्राप्त सामंजस्य (MoU) करार मसूदा प्रस्ताव तपासून घेणे बाबत दि.२०/०३/२०२५ रोजीच्या टिपणीअन्वये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सदरील मसूदा MoU समिती कडे पाठविण्यात आला आहे. दि.२१/०३/२०२५ रोजी झालेल्या MoU समिती च्या बैठकीत सामंजस्य कराराच्या मसूद्यास त्रुटींसह मान्यता देण्यात आली आहे.<br>MoU समिती च्या मान्यतेअंती सदरील सामंजस्य कराराचा मसूदा प्रस्तुत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यता घेणे आवश्यक असल्याने व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत प्राप्त सामंजस्य कराराचा मसूदा हा तात्काळ मान्यता घेवून करण्यात यावा असे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन यांनी सूचित केले असल्याने सदरील सामंजस्य करार करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आली आहे.<br>सबब, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव. | कौशल्य विकास केंद्र |
| ठराव : | **महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत श्री. प्रशांत रावसाहेब चोरमले, सिस्टिम ॲनालिस्ट यांना परीक्षा व मूल्यमापन विभाग येथे रुजू करुन घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: श्री. प्रशांत रावसाहेब चोरमले, सिस्टिम ॲनालिस्ट यांचा निलंबन विहित प्रक्रियेअंती संपुष्ठात आणण्यात येऊन, व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या ठरावानुसार त्यांना प्रस्तुत विद्यापीठात पुनर्स्थापित करुन रुजू करुन घेण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीमध्ये श्री. प्रशांत रावसाहेब चोरमले हे दि.१४/०५/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार आय. टी. सेलचे समन्वयक म्हणून कार्यरत असून, कामकाज पाहत आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील परीक्षेसंदर्भात दैनंदिन कामकाजामध्ये विविध तांत्रिक अडचणी येत असून, त्यांच्यामुळे परीक्षेच्या कामावर परिणाम होत असून, भविष्यात अनेक तांत्रिक व गंभीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सद्यस्थितीमध्ये परीक्षा विभागामध्ये कंत्राटी प्रोग्रामर व कंत्राटी सिस्टिम ॲनालिस्ट कार्यरत आहेत. परंतु त्यांच्यावर देखरेख व त्याचप्रमाणे परीक्षेच्या दैनंदिन कामकाजामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व परीक्षेचे दैनंदिन कामकाज हे जबाबदारीने पार पाडण्यासाठी कायम सिस्टिम ॲनालिस्ट असणे आवश्यक आहे. श्री. प्रशांत रावसाहेब चोरमले, हे सिस्टिम ॲनालिस्ट या नियमित पदावर कार्यरत होते व त्यांनी नियुक्तीपासून प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात सिस्टिम ॲनालिस्ट म्हणून कामकाज पाहिलेले असून, त्यांना परीक्षेसंबंधीच्या दैनंदिन कामकाजाबाबत व विविध तांत्रिक अडचणी व त्यांचे समाधानाबाबत माहिती असल्याकारणाने त्यांना परीक्षा व मूल्यमापन विभाग येथे रुजू करुन घेणे आवश्यक आहे.<br>सबब, वरील बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव : | **सदरचा विषय सर्वानुमते मागे घेण्यात आला.** | |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ (१) ] | **दि.२६/०३/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.२६/०३/२०२५ रोजीच्या खरेदी समितीची बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२६/०३/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेची मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.२६/०३/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने ठराव क्र.२ अन्वये शिफारस केलेला दि.२६/०३/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव : | **दि.२६/०३/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या दि.२६/०३/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद